Circular file

# कार्यालय,श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती

जा.क्र.शि/अधि /प्रशा–५/ ११७६ /२०२० दिनांक : १९/३/२०२०

## कार्यालयीन परिपत्रक

प्रति,

**श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावतीच्या मुख्य**
**कार्यालयातील सर्व अधिकारी,कर्मचारी.**

**विषय :– करोना विषाणु (केव्हीडी १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना संदर्भात.**

संदर्भः– १. संस्था कार्यालयाचे परिपत्रक क्र. अधि/५/१११२/२०२० दि. १३.३.२०२०
२. महाराष्ट्र शासन –शासन निर्णय क्र.समय–२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.व का.) दि. १८ मार्च,२०२०

कृपया वरील विषयांकित संदर्भातील पत्राचे व शासन निर्णयाचे अवलोकन करावे. करोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत संस्थें अंतर्गत सर्व शाळा,महाविद्यालये, वसतीगृहे व इतर संस्था बंद ठेवण्या बाबत सूचना निर्गमीत केलेल्या आहेत.

तसेच संदर्भातील दि. १८ मार्च,२०२० च्या शासन निर्णयानुसार संस्था कार्यालयातील कर्मचा–यांची उपस्थिती विभाग निहाय्य खालील प्रमाणे ठेवण्यात येत आहे. संबधीत विभागातील कर्मचा–यांनी स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविलेल्या दिनांकास कार्यालयात येवू नये. मात्र निवासस्थानी हजर असणे गरजेचे राहील. तसेच दुरध्वनीवर संपर्क साधल्यास त्याबद्दलची माहिती आपणांस देणे बंधनकारक राहील. दुरध्वनी बंद ठेवु नये.तसेच दि.२१.३.२०२० ला शनिवारी कार्यालय बंद राहील.

विभाग निहाय आठवडयातील रोटेशन पध्दतीने दिनांक २३.३.२०२० ते ३१.३.२०२० पर्यंत कार्यालयातील कर्मचारी संख्या कमी ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | वार व दिनांक | बंद असणारे विभाग | एकूण कर्मचारी |
|---|---|---|---|
| १ | सोमवार दि. २३.३.२०२० | १.माध्यमिक विभाग<br>२.बांधकाम विभाग<br>३.निरीक्षक कक्ष | ०४<br>०६ अधिकारी ०१<br>०२ अधिकारी ०३ |
| २ | मंगळवार दि. २४.३.२०२० | १. उच्च शिक्षण विभाग<br>२. अंकेक्षण विभाग<br>३. संगणक विभाग<br>४. मालमत्ता विभाग | ०४ प्रतिनियुक्ती ०३<br>०२<br>०२<br>०२ |
| ३ | बुधवार दि. २५.३.२०२० | सुटी गुढी पाडवा | |
| ४ | गुरूवार, दि. २६.३.२०२० | कार्यकारी परिषदेची सभा असल्यामुळे सर्व कर्मचा–यांनी कार्यालयीन वेळेत हजर राहावे. | |
| ५ | शुक्रवार, दि. २७.३.२०२० | १. प्रशासन विभाग<br>२. लेखा विभाग<br>३. विधी विभाग<br>४. सचिव विभाग | ०६<br>०३<br>०२<br>०२ |
| ६ | शनिवार,दि. २८व रविवार दि.२९.३.२०२० ० | कार्यालय बंद राहील. | |
| ७ | सोमवार,दि.३०.३.२०२० | १.माध्यमिक विभाग<br>२.बांधकाम विभाग<br>३.निरीक्षक कक्ष | ०४<br>०६ अधिकारी ०१<br>०२ अधिकारी ०३ |
| ८ | मंगळवार,दि.३१.३.२०२० | १. उच्च शिक्षण विभाग<br>२. अंकेक्षण विभाग<br>३. संगणक विभाग | ०४ प्रतिनियुक्ती ०३<br>०२<br>०२ |

तसेच कार्यालयातील श्री डी.डी.बागल,अधिक्षक,प्रशासन,श्री जे.बी.भांगे अधिक्षक, उच्च शिक्षण, श्री एस.पी भोकसे,अंकेक्षक श्री ए.जे.ईखे, मा.अध्यक्ष यांचे स्विय सहाय्यक, श्री जी.जे.रोहणकर, मा.सचिव यांचे स्विय सहाय्यक यांना कार्यालयात दैनंदिन हजर राहाणे अनिवार्य राहील.

सचिव,
श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती

प्रत सविनय सादर :–
१.मा.अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांचे स्विय सहाय्यक यांना माहितीकरीता.
२.मा.कोषाध्यक्ष,श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांना माहितीकरीता सादर.

प्रतिलिपी :–
१.अधिक्षक,प्रशासन,श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
२.संस्थेच्या मुख्य कार्यालयातील सर्व अधिकारी,कर्मचारी यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता रवाना.

Circular file

# कार्यालय,श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती

जा.क्र.शि/अधि /प्रशा–५/ ११७५ /२०२०

दिनांक : १९/३/२०२०

अत्यंत महत्वाचे

## कार्यालयीन परिपत्रक

प्रति,

**श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती व्दारा**
**संचालित सर्व शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य/मुख्याध्यापक**
**वसतीगृहाचे अधिक्षक व इतर संस्थेचे संस्था प्रमुख इत्यादी,**

**विषय :– करोना विषाणु (केव्हीडी १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना संदर्भात.**

संदर्भः– १. मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.कावी–३७ दि. ११ मार्च, २०२०

२. संस्था कार्यालयाचे परिपत्रक क्र.अधि/५/१०७३ दि. १३.३.२०२०

३. प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. करोना २०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च,२०२०

४. उपसचिव,महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. संकिर्ण २०२०/ (स.क्र.११४/२०) विशि १ दि.१४ मार्च,२०२०

५. शिक्षण संचालक,उ.शि. महाराष्ट्र राज्य पुणे १ यांचे पत्र क्र. करोना मवि १/२०२०/३७७८ दि.१४ मार्च २०२०

६. सहसंचालक,अमरावती विभाग,अमरावती यांचे पत्र क्र. १४४४ दि १५.३.२०२०

७. कुलसचिव,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती यांचे पत्र क्र.संगाबाअवी ८/ सी–५२२/२०२० दि.१५ मार्च,२०२०

८. शिक्षणाधिकारी,माध्य.जि.प.अमरावती यांचे पत्र क्र. माध्य.क्यू २०२० दि. १५.३.२०२०

९. संस्था कार्यालयाचे परिपत्रक क्र. अधि/५/१११२/२०२० दि. १३.३.२०२०

१०. महाराष्ट्र शासन –शासन निर्णय क्र.समय–२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.व का.) दि. १८ मार्च,२०२०

कृपया वरील विषयांकित संदर्भातील पत्राचे व शासन निर्णयाचे अवलोकन करावे. करोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत संस्थें अंतर्गत सर्व शाळा,महाविद्यालये, वसतीगृहे व इतर संस्था बंद ठेवण्या बाबत सूचना निर्गमीत केलेल्या आहेत.

असे निदर्शनास येत आहे की, संस्थे अंतर्गत शाळा, महाविद्यालये, वसतीगृहातील कर्मचारी शुल्लक कामकाजाकरीता वारंवार संस्थेच्या मुख्य कार्यालयात येवुन गर्दी करतात. हया आदेशानुसार आपणांस सुचित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त असणारे कर्मचारी तसेच आपण सुध्दा महत्वाचे काम असल्यासच संस्था कार्यालयात यावेत व ज्या कर्मचा–यास कार्यालयीन कामकाजासाठी पाठविले आहे त्यांना आपल्या स्वाक्षरीचे पत्र देण्यात यावे, त्या शिवाय त्या कर्मचा–यांना संस्थेच्या कार्यालयात प्रवेश देण्यात येणार नाही व गैरसोय टाळण्याकरीता अधिनस्त सर्व कर्मचा–यांना या बद्दलच्या सूचना आपल्या स्तरावरून निर्गमीत कराव्यात. अत्यंत महत्वाचे कामकाज असल्यास प्राचार्य/मुख्याध्यापकांनी सचिवांशी संपर्क साधावा.

तसेच संदर्भातील दि. १८ मार्च,२०२० च्या शासन निर्णयानुसार शाळा महाविद्यालयातील कर्मचा–यांची उपस्थिती ठेवण्याची कार्यवाही प्रशासकीय कामकाज खोळंबणार नाही,याबद्दलची खबरदारी घेवुन करावी व हया बाबीस विशेष प्राधान्य द्यावे.

(एस.एस.खाडे)
सचिव,
श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती

प्रत सविनय सादर :–
१.मा.अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांचे स्विय सहाय्यक यांना माहितीकरीता.
२.मा.कोषाध्यक्ष,श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांना माहितीकरीता सादर.

प्रतिलिपी :–
१.अधिक्षक,प्रशासन,श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
२.संस्थेच्या मुख्य कार्यालयातील सर्व अधिकारी,कर्मचारी यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता रवाना.